**MHAH230005012024**

**<u>हिंदू विवाह अर्ज क्र. ८८/२०२४ मधील नि.१७ वरील आदेश</u>.**

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. सामनेवाली यांनी त्यांचे अर्जात कथन केले आहे की, मुदतीत कैफियत देणे आवश्यक होते. परंतु कैफीयतीसंबंधीची आवश्यक ती माहिती व कागदपत्रे यांची जमवाजमव वेळेत करता न आल्यामुळे त्यांना मुदतीत कैफियत दाखल करता आली नाही. सामनेवाली यांनी जाणिवपुर्वक विलंब केलेला नाही. तरी कैफीयत देण्यास परवानगी मिळावी असे त्यांचे कथन आहे.

३. अर्जदाराने नि.क्र.२१ अन्वये अर्जास म्हणणे देऊन हरकत दर्शविली. त्यांच्या कथनानुसार अर्ज कायदेशीर नाही. सामनेवालीने दिलेले विलंबाचे कारण योग्य व कायदेशीर नाही. तसेच सामनेवालीने तिला मुदतीत कोणती कागदपत्रे मिळाली नाहीत याचा उल्लेख केलेला नाही तरी अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, सामनेवाली हिस दि.०८/०१/२०२५ रोजी अर्जाचे नोटीसची बजावणी झालेली असून ती दि. ०१/०२/२०२५ रोजी प्रकरणात हजर झाले. परंतु सामनेवालीने मुदतीत म्हणणे दिले नाही. समन्स बजावणीपासून कमीत कमी ३० व जास्तीत जास्त ९० दिवसांत कैफियत देणे आवश्यक होते. परंतु सामनेवालीने विहित मुदतीत कैफीयत दिलेली नाही. सामनेवाली हिने प्रस्तुत अर्ज दि.०२/०५/२०२५ रोजी

कैफियतीसह दाखल केला. प्रस्तुत अर्ज हा हिंदू विवाह कायदा १९५५ चे कलम १३(१), (i–a), (i–b) प्रमाणे विवाह विच्छेदन होऊन मिळणेकामी दाखल करण्यात आलेला असल्यामुळे सामनेवाली हिस कैफीयत देण्यास संधी न दिल्यास मुळ वादमुद्दा गुणदोषावर निर्णित न होता नवीन प्रकरण दाखल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याउलट कैफीयत अभिलेखावर आल्यास उभय पक्षकारांचा पुरावा होवून वादातील मुदयांचे एकाचवेळी गुणदोषावर निरसन होईल. त्यामुळे कैफियत देण्यास झालेला विलंब माफ करणे न्यायाचे दृष्टीने संयुक्तिक ठरणार आहे. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

अर्ज (नि.१७) मंजूर करण्यात येत आहे.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN

Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2025.07.04 16:35:38 +0530

श्रीगोंदा.
दिनांक ०४/०७/२०२५.

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.